# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## नवीन महाविद्यालय/अभ्यासपाठयक्रम/विषय/विद्याशाखा/तुकडी/सॅटलाईट केंद/ संशोधनकेंद्रा करिता

## जाहीर प्रगटन

(शासन पत्र क्र. संकीर्ण–२०२०/प्र.क्र.४१/विशि–५ दि. १७ डिसेंबर, २०२० व . संकीर्ण–२०२०/प्र.क्र.४१/विशि–५ दि.२२ डिसेंबर, २०२० अन्वये व वृत्तपत्रातील संक्षिप्त जाहिर प्रगटनाचा सविस्तर तपशील)

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड हे बृहत आराखडया अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करिता विद्यापीठ कार्यक्षेत्रात (नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर जिल्हा) नवीन महाविद्यालये व संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम /विद्याशाखा/तुकडी/सॅटेलाईट केंद्र, संशोधन केंद्र इत्यादीसाठी संबंधीत संस्थेकडून प्रस्ताव मागविण्यांत येत आहेत. सादर करावयाचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव / आवेदनपत्र, विद्यापीठाचा बृहत आराखडा व वार्षिक योजना (Perspective / Yearly Plan २०२१–२२) परिशिष्टांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

संस्था/महाविद्यालयांनी आवेदनपत्र/प्रस्ताव, सादर करतांना शासन निर्णयात नमुद परिशिष्ट 'अ' सह विहीत केल्या प्रमाणे, विहीत शुल्कासह परिशिष्ट 'ब' नुसार आवेदनपत्र/प्रस्तावा सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे क्रमाने जोडुन विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख दि. ३१/१२/२०२० ही आहे. सर्व संबंधितास आवेदनपत्र / प्रस्ताव शनिवार (प्रथम/तिसरा), रविवार व इतर सार्वजनिक सुट्टया वगळून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दाखल करता येतील. अंतीम तारखेनंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

महाराष्ट्र शासनाचे दि. १३/०९/२०१७ व दि. १५/०९/२०१७ व वेळोवेळीचे शासन निर्णय व निर्देश, विद्यापीठ अनुदान आयोग ( विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण ) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदी व बृहत आराखडयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संस्थेने नवीन महाविद्यालये, संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी/सॅटेलाईट केंद्र, संशोधन केंद्र इत्यादीसाठीची मागणी करण्यापूर्वी विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयात NAAC / NBA/ QCI, नियीमत प्राचार्यांची नियुक्ती, विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षक संख्या, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपलब्धता, आवश्यक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि ईतर इमारती, वीज, पाणी, स्वच्छतागृह इत्यांदींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था, आर्थीक तरतुद इत्यादी सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन महाविद्यालये, संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी/सॅटेलाईट केंद्र, संशोधन केंद्र यासाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी.

संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाचे व वर नमुद बाबींचे छायाचित्रे व व्हिडीओ शुटींग करून त्याची डी.व्ही.डी प्रस्तावाच्या प्रत्येक प्रतीसोबत जोडण्यात यावी. संस्थेच्या प्राप्त प्रस्तावातील परिशिष्ट 'ब' नुसार छाननी समितीने पात्र केलेल्या प्रस्तावाकरिता पाहणी समिती पाठविण्यात येईल. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ नुसार नवीन महाविद्यालये, संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी/सॅटलाईट केंद, संशोधन केंद्र यासाठी प्रस्तावाच्या अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावरून प्राप्त करून ०३ (तीन) प्रतिमध्ये आवश्यक शुल्कासह दाखल करावा.

**टिप: मौजे धनगरवाडी ता.जि.नांदेड हा स्थळबिंदूसाठी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलर असल्यामुळे नविन महाविद्यालयाचा प्रस्ताव स्विकारता येणार नाही. प्रस्ताव दाखल केल्यास ग्राहय धरता येणार नाही.**

विद्यापीठ संकेतस्थळ : www.srtmun.ac.in News/ Academic Circular

संदर्भ शैक्षणिक/संलग्न–०३/२०२०–२१/१७४७ स्वा/–
दिनांक : २२/१२/२०२० कुलसचिव
स्थळ : नांदेड